# ‘भुयारी’ची जय्यत तयारी

काळबादेवी, गिरगाव आणि ग्रँट रोडच्या भुयारातून लवकरच धावणार मेट्रो

- मेट्रो ट्रेनच्या चाचणीची तयारी सुरु आहे.
- मरोळ मरोशी येथे होणाऱ्या चाचणीसाठीचे कोच आंध्र प्रदेशहून मुंबईत दाखल झाले आहेत.
- कार डेपोचे काम पूर्ण करुन सीप्झ ते बी.के.सी.पर्यंतचा पहिला टप्पा २०२४ दरम्यान सुरु होईल.

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या देशातील पहिल्यावहिल्या भुयारी मेट्रो-३ चे काम वेगाने सुरू आहे. मेट्रो -३ च्या पॅकेज २ मधील छत्रपती शिवाजी टर्मिनस, काळबादेवी, गिरगाव आणि ग्रँट रोड या स्थानकांचे सिव्हिल वर्क ७५ टक्के पूर्ण झाले आहे. तर बोगद्याचे काम ९५ टक्के पूर्ण झाले आहे. त्याचबरोबर स्थानकांचे काम ५६ टक्के पूर्ण झाल्याचा दावा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने केला आहे.

## मिठी नदीखालील भुयारीकरणाचे आव्हान

मिठी नदीखालील भुयारीकरण मेट्रो-३ प्रकल्पातील सर्वात आव्हानात्मक कामांपैकी एक होते. गुंतागुंतीची भौगोलिक रचना, भूगर्भातील पाण्याची उच्च पातळी शिवाय कोविड - १९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे येणाऱ्या मर्यादा यामुळे हे काम अधिकच कठीण होते. मात्र टीमने हे शिवधनुष्य यशस्वीपणे पार पाडले.

**९५%** भुयारी मेट्रो ३ च्या बोगद्याचे ९५ टक्के काम पूर्ण




- मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो ३ मार्गाचे काम वेगाने सुरु असून, कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी



नुकतेच मेट्रोच्या कामाची पाहणी करत झालेल्या कामाबाबत समाधान व्यक्त केले आहे. भिडे यांनी या प्रकल्पातील पॅकेज २ ची पाहणी केली. या पॅकेजमध्ये छत्रपती शिवाजी टर्मिनस, काळबादेवी, गिरगाव आणि ग्रँट रोड या स्थानकांचा समावेश आहे. दक्षिण मुंबईत हे काम सुरु आहे. येथे खूप जुन्या इमारती आहेत. त्यामुळे येथे काम करणे खूप जिकिरीचे आहे. काम करण्यासाठी पुरेशा जागा नाहीत. तरीही कॉर्पोरेशनने हे आव्हान पेलत काम वेगाने मार्गी लावण्यावर भर दिला आहे. दरम्यान, येथील काम डिसेंबर **२०२३** पर्यंत पूर्ण करण्यावर अधिक भर असल्याचे कॉर्पोरेशनकडून सांगण्यात आले.

**५६%** स्थानकांचे ५६ टक्के काम पुर्ण झाले असून उर्वरित कामे वेगाने सुरु आहे